# नि.क्र.४६ वर आदेश
# (दिनांक ०५.०३.२०२१)

प्रतिवादी क्र.१२ व १४ यांनी सदरच्या दाव्यात दस्ताऐवज दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. प्रतिवादी क्र.१२ व १४ यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना सदरच्या दाव्यात महत्त्वाचे दस्ताऐवज दाखल करायचे आहे. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, त्यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. वादींच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादींच्या सदरच्या अर्जाला त्यांचा तिव्र आक्षेप आहे.

३. सदरचा दावा हा जे प्रतिवादी त्यात हजर झाले आहेत त्यांच्या लेखी जबाबाकरीता व त्यांच्या तात्पुर्त्या मनाई हुकूमाच्या अर्जावर उत्तराकरीता प्रलंबित आहे. तसेच जे प्रतिवादी हजर झाले नाहीत त्यांच्या अहवालाकरीता सुध्दा प्रलंबित आहे. त्यामुळे सदरच्या प्रतिवादींनी दाखल केलेले दस्ताऐवज अभिलेखावर घेतल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज मंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by Amol Ramchandra Surve
Date: 2021.03.05 17:08:06 +0530

(अ.रा. सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
अहमदपूर.

अहमदपूर
दिनांकः– ०५.०३.२०२१